# विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (न्यायालय क्रं.1), पुणे यांचे न्यायालय

| | | |
|---|---|---|
| १) गुन्हा घडल्याची तारीख | : | १६–०८–२२ |
| २) गुन्हा नोंद झाल्याची तारीख | : | २६–०८–२२ |
| ३) तक्रारकर्ता, नाव व पत्यासह | : | महाराष्ट्र शासन |
| ४) आरोपीचे नाव | : | **वादीराज मांजया शेट्टी**<br>वय– ५५ वर्षे, व्यवसाय–<br>रा. पुणे |
| ५) गुन्ह्याचा तपशील | : | |

दि.१६–०८–२२ रोजी पुणे येथे १०० यार्ड अंतराचे आत, स्वतःची / भाडयाचे दुकान चालवुन त्या ठिकाणी इतरांना धुम्रपान करणेसाठी सिगारेट, बिडी, तंबाखुजन्य पदार्थ विक्री करीता ठेवलेला मिळुन आला व त्याप्रमाणे तुम्ही सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार , वाणिज्य, उत्पादन , पुरवठा आणि वितरण विनयमन) अधिनियम कलम २००३ चे कलम ७ (२) सह कलम २० (२) अन्वये गुन्हा केला आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रश्न ठाक्रं.१ | : | तुम्हाला चालानाची प्रत मिळाली आहे काय ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न क्रं.२ | : | तुम्हाला गुन्ह्याचा तपशील वाचून व समजावून सांगीतला, तो समजला काय ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न क्रं.३ | : | तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ? |
| उत्तर | : | होय मला गुन्हा कबुल आहे. |

आरोपीची सही

समक्ष

..........................

(आर व्ही डफरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्रं.१) पुणे.

पुणे
दिनांक : ११/०२ /२०२३

मा. श्रीमती. आर.व्ही. डफरे, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं.१,
पुणे यांचे न्यायायलयात.

<u>न्यायनिर्णय</u>

आरोपीवर ठेवण्यात आलेला आरोप वाचुन व समजावुन सांगीतला असता त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगीतले. याबाबत त्याने पुरसिस नि.क्रं.२ दाखल केली आहे. करिता आरोपी शिक्षेस पात्र आहे. आरोपीचे शिक्षेवर म्हणणे ऐकण्यात आले. आरोपीने तो त्याचे कुटूंबातील एकमेव कर्ता व्यक्ती असुन त्याची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने कमीत कमी द्रव्य दंडाची शिक्षा करावी अशी विनंती केली आहे. नमुद कलमाअंतर्गतची शिक्षा, आरोपीचे म्हणणे तसेच त्याच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. आरोपी **वादीराज मांजया शेट्टी** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये दोषी धरण्यात येवुन कलम ७ (२) सह कलम २० (२) तुम्ही सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार , वाणिज्य, उत्पादन , पुरवठा आणि वितरण विनयमन) अधिनियम कलम २००३ अन्वये रु. १०० /- ( रुपये शंभर ) इतक्या रकमेच्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने २ दिवस साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

२. आदेशाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी.

निकाल खुल्या न्यायपिठात घोषित करण्यात आला.

( र. व्य. डफरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, पुणे.
दिनांक : ११/०२ /२०२३

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | R.V.Dafrey, Judicial Magistrate F.C. Court No.1, Pune. |
| Name of Steno | : | Y.P. Ambure, Grade – 3. |
| Date | : | 11/02/2023 |
| Judgment signed by presiding officer on | : | 11/02/2023 |
| Judgment uploaded on | : | 11/02/2023 |